सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/3126
दिनांक : 19 NOV 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विना-अनुदानित
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण ) कायदा, २०१३ (POSH Act )ची प्रभावी अंमलबजावणी करुन अद्यावत संकलित माहिती Improved Version of SHe Box Portal वर Upload करुन Update करण्याबाबत**

**संदर्भ:-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/डिटिई Online मान्यता-परिपत्रक / २०२५-२६/१०२६ दिनांक १८/११/२०२५.

उपरोक्त विषयान्वये या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विना-अनुदानित पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांना कळविण्यात येते की, कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा, २०१३ जनजागृती ची प्रभावी अंमलबजावणी करुन अद्यावत संकलित माहिती Improved Version of SHe Box Portal वर Upload करुन Update करावयाची आहे. संस्थांनी SHe Box Portal वर आपले संस्थेचे रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. रजिस्ट्रेशन करिता **https://shebox.wcd.gov.in** या वेबसाईट वर जाऊन खालील मुद्येनिहाय माहिती भरावी.

- **शासकीय संस्थांकरिता रजिस्ट्रेशन प्रक्रिया-**

➢ शासकीय संस्थांनी त्यांच्या जिल्हयाच्या महिला व बालविकास केंद्र यांचे कडून Head of Institute / Nodal Officer (SHe Portal) यांची माहिती देऊन त्यांचे ऑफिस Add करुन घ्यावे.

➢ Head of Institute / Nodal Officer (SHe Portal) यांची माहिती देतांना जो ईमेल आयडी दिला असेल तो ईमेल आयडीच SHe Portal वर Login Id म्हणून वापरावा लागतो.

➢ महिला व बालविकास केंद्र यांचे कडून संस्था Approve झाल्यावर संस्थेने दिलेल्या ईमेलवर Password Reset करायची लिंक येते.

➢ Password Reset करुन झाल्यावर नवीन Password ने Login करुन संस्थेच्या Internal Committee ची माहिती भरावी.

- **अशासकीय संस्थांकरिता रजिस्ट्रेशन प्रक्रिया-**

➢ सदर वेबसाईट वर जाऊन Private Head Office Registration वर Click करावे.

➢ त्यात संस्थेच्या **Head of Institute व Nodal Officer (SHe Portal** साठीचे**)** यांची माहिती भरावी. तसेच संस्था स्थापन झाली त्याचे पत्र अपलोड करावी.

➢ Nodal Officer ( SHe Portal) चा ई-मेल आयडी हा SHe Portal वर Login Id म्हणून वापरावा लागतो.

➢ जिल्हयाच्या महिला व बालविकास केंद्र यांचे कडून संस्था Approve झाल्यावर Nodal Officer च्या ईमेल वर Login Id & Password येतो. संस्थेने Login करुन संस्थेच्या Internal Committee ची माहिती भरावी.

याबाबत काही अडचण आल्यास संबंधित जिल्हयातील महिला व बालविकास क्रेंद्राशी संपर्क साधावा**.**

वरिलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,**
**अमरावती.**

**प्रत :** प्रोग्रामर, तं.शि.वि.का,अमरावती यांना ईमेल व संकेतस्थळावर टाकण्याकरीता.